॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462)215572
Phone: (02462)215542

**Academic-1 (BOS) Section**

website: srtmun.ac.in
E-mail: bos@srtmun.ac.in

**शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० आराखडया नुसार पदवीस्तरावर Generic Elective निवडण्यासाठीची नियमावली.**

# परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, या विद्यापीठा अंतर्गत संलग्नित महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण –२०२०ची अंमलबजावणी बी.ए, बी.कॉम, व बी.एस्सी पदवी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी करण्यात येत असून त्यासंदर्भात प्रथम वर्षात जेनरिक/ओपन इलेक्टीव्ह विषय निवडण्यासंबंधाने विविध महाविद्यालयांकडून अनेकदा विचारणा केली जात आहे. त्या अनुषंगाने पदवी प्रथम वर्षात जेनरिक इलेक्टीव्ह विषय निवडण्यासाठी खालील प्रमाणे नियमावली जाहीर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांनी तो शिकत असलेली विद्याशाखा व्यतिरिक्त इतर विद्याशाखेतील जेनरिक इलेक्टीव्ह विषय निवडणे बंधनकारक आहे.
२. एकच विद्याशाखा असलेल्या महाविद्यालयात हा विषय निवडताना इतर विद्याशाखेतील पर्यायी विषय निवडणे आवश्यक आहे. उदा. कला शाखेच्या महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्र, शारिरीक शिक्षण, गृह विज्ञान, ई. विषयातील जेनरिक इलेक्टीव्ह विषय घेता येतील.
३. एकाच संस्थेची एकापेक्षा अधिक महाविद्यालये असतील तर विद्यार्थ्यांना अशा दुसऱ्या महाविद्यालयातील जेनरिक ईलेक्टीव्ह विषय निवडता येतील.
४. एकाच शहरात एकापेक्षा जास्त महाविद्यालये असतील तर अशा परिस्थितीत इतर महाविद्यालयात उपलब्ध संसाधनांचा वा तज्ञांच्या सहाय्याने हा अभ्यासक्रम पूर्ण करता येऊ शकतो. अशा महाविद्यालयांनी आपापसात सामंजस्य करार करण्यासाठी विद्यापीठ प्रोत्साहन देते.
५. जेनरिक इलेक्टीव्ह हा विषय विद्याशाखा बदलून घ्यावयाचा असल्यामुळे मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये शिकवणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना या विषयाची परीक्षा मराठी व इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये लिहिण्याची मुभा असेल.
६. विद्यार्थ्यांना हा विषय ऑनलाइन पध्दतीने देखील पूर्ण करता येऊ शकतो व त्यासाठी विद्यापीठाकडून काही पर्याय उपलब्ध करून दिले जातील. ज्यात सायबर सेक्युरीटी, Foreign Language (French, Spanish) चे विषय उपलब्ध असतील. या संदर्भातील शुल्का बाबतचा निर्णय अधिकार मंडळाच्या मान्यतेनंतर कळविण्यात येईल.
७. कुठल्याही परिस्थितीत जेनरिक इलेक्टीव्ह हा विषय विद्यार्थ्यांना त्यांची मुळ विद्याशाखा बदलून घेणे आवश्यक आहे.

सदरील परिपत्रक पदवी प्रथम वर्षात प्रवेश घेत असलेले विद्यार्थी, प्राध्यापक व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे, ही विनंती.

डॉ. सरिता लोसरवार
सहा.कुलसचिव
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
जा.क्र.:शै–१/एनईपी/जेनरिक ईलेक्टीव/२०२४–२५/९५१
दिनांक १०.०७.२०२४

प्रत : १) मा. आधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. प्राचार्य, सर्व संबधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा. संचालक, सर्व संकुले परिसर व उपपरिसर, प्रस्तुत विद्यापीठ
५) मा. प्राचार्य, न्यू मॉडल डिग्री कॉलेज हिंगोली.
६) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. याना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.